# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

६८ वा विद्यापीठ वर्धापनदिन व जीवनसाधना पुरस्कार वितरण सोहळा- २३ ऑगस्ट २०२६

## :: परिपत्रक ::

सर्व शैक्षणिक, प्रशासकीय विभागप्रमुख, प्राध्यापक, अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या **६८** व्या वर्धापन दिनानिमित्त **दि. २३ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ठीक ९.०० वाजता** प्रशासकीय इमारतीसमोरील हिरवळ येथे मा. कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. त्यानंतर नाट्यगृहामध्ये सकाळी ९.१५ ते ९.४५ दरम्यान सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

त्यानंतर **सकाळी ठीक १०.०० वाजता** विद्यापीठ नाट्यगृहात ६८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून **मा. डॉ. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक** हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात **मा. श्री. भास्कर मुंढे** यांना जीवन साधना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तसेच विद्यापीठाच्या विविध परिक्षेमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा व विविध परिक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सत्कार मा. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. याशिवाय उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट प्राचार्य, उत्कृष्ट शिक्षक व उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी हे पुरस्कारदेखील प्रदान करण्यात येणार आहेत. हा कार्यक्रम मा. कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होईल.

ध्वजारोहणास आणि सदरील कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर ४३१ ००४ )(
संदर्भः- सा.प्र./२०२६/131 )(
दिनांक :- १९-०८-२०२६ )(

कुलसचिव

**प्रत-** मा. संचालक, युनिक विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात येऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना अवगत करावे.